# राज्य विधिमंडळ

घटनेचा भाग ६ मधील १६८ ते कलम २१२ - राज्यविधिमंडळा संदर्भात.

**संघटन** → बहुतेक राज्यांमध्ये एकगृही विधिमंडळ
→ काही राज्यामध्ये द्विगृही ⟹ बिहार, कर्नाटक, महाराष्ट्र, उ.प्रदेश, आंध्र व तेलंगणा
(कलम १६९) तसेच जम्मू व काश्मीर
=6 }7
=1

तामिळनाडू विधानपरिषद (२०१०) कायदा → अमलात आला नाही.
⇒ २०१० - ता.नाडू - विधानसभेने विधानपरिषदेचे पुनरुज्जीवन करावे - असा ठराव.
⇒ २०११ - हा कायदा अंमलात येण्यापूर्वी पुन्हा प्रस्तावित विधानपरिषद रद्द करण्याचा ठराव.

आंध्र प्रदेश विधानपरिषद कायदा - २००५ - नुसार विधानपरिषदेचे पुनरुज्जीवन.

सातवी घ.दु - १९५६ — म.प्रदेश - विधानपरिषद स्थापन करण्याची तरतूद - परंतु राष्ट्रपतीने अधिसूचना अद्याप नाही

## दोन्ही गृहांची रचना

**1) विधानसभा**
**सदस्य**
→ थेट निवडून दिलेले प्रतिनिधी — सार्वत्रिक प्रौढ मताधिकार
→ कमाल सदस्यसंख्या ५०० किमान ६०
⇒ अरुणाचल प्र. (60) सिक्कीम (32) गोवा (40) साठी किमान 30
मिझोराम → ४० तर नागालँडमध्ये - ६० आहे.
⇒ सिक्कीम व नागालँडच्या विधानसभांमध्ये काही सदस्य अप्रत्यक्ष पद्धतीने निवडून येतात.
⇒ नामनिर्देशित - 1 - अँग्लो इंडियन.

**क्षेत्रिय मतदारसंघ** ⇒ लोकसंख्येच्या आधारावर
आतापर्यंत - १९५२, १९६२, १९७२ व २००२ - परिसीमन आयोग कायदे.

४२वी घ.दु - १९७६ — १९७१ जनगणना आधारभूत
८४ वी घ.दु २००१ — १९९१ — ॥ —
८७ वी घ.दु २००३ — २००१ — ॥ —
} २०२६ पर्यंत

SC/ST - आरक्षण - लोकसंख्येच्या प्रमाणात.
सुरुवातीला १९६० पर्यंत
२००९ - ९५वी घ.दु - नुसार २०२० पर्यंत.

Scanned by CamScanner

## विधानपरिषदेची संरचना →

⇒ सदस्यांची निवड - अप्रत्यक्ष पद्धतीने.

⇒ कमाल सदस्य संख्या विधान सभेतील सदस्य संख्येच्या 1/3 असते. व किमान 40.
(म्हणजेच संख्या विधान सभेच्या सदस्य संख्येवर आधारित)

⇒ कमाल व किमान मर्यादा ठरविलेल्या असल्या तरी विधानपरिषदेची प्रत्यक्ष सदस्यसंख्या संसद ठरविते.

⇒ किमान संख्या 40 - जम्मू-काश्मीरला लागू नाही. - ३६ सदस्य.

## निवडणुकीची पद्धती

एक तृतीयांश (1/3) ⇒ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांकडून.

एक बारांश (1/12) ⇒ राज्यात वास्तव्य करणाऱ्या पदवी घेवून ३ वर्षे पूर्ण झालेल्या पदवीधर व्यक्तींच्या मतदारसंघातून.

एक बारांश (1/12) ⇒ राज्यातील माध्य. शाळा व त्यापेक्षा उच्च शैक्षणिक संस्था यांत कमीत कमी 3 वर्षे शिक्षक म्हणून काम केलेल्या शिक्षकांच्या मतदारसंघातून.

एक तृतीयांश (1/3) ⇒ राज्यातील विधानसभा सदस्य (सदस्य नसलेल्या व्यक्तीमधून)

एक षष्ठांश (1/6) ⇒ साहित्य, कला, विज्ञान, सहकारी चळवळ, व समाजसेवा या क्षेत्रातील नामवंत व्यक्ती राज्यपालांद्वारे नामनिर्देशित केल्या जातात

## दोन्ही गृहाचा कार्यकाल

① विधानसभा ⇒ अस्थायी सभागृह.
सर्वसाधारणपणे पहिल्या बैठकीपासून 5 वर्षे (त्यानंतर आपोआप विसर्जित)

⇒ पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी राज्यपाल नव्याने निवडणुका घेण्यासाठी विधानसभा विसर्जित करू शकतो.

* राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात हा कार्यकाल एका वेळी एक वर्ष याप्रमाणे कितीही कालावधीसाठी वाढविता येतो.

② विधानपरिषद ⇒ स्थायी सभागृह - 1/3 सदस्य निवृत्त व फेरनिवड → दर २ वर्षांनी

⇒ सदस्यांचा कार्यकाल 6 वर्षे.

⇒ निवृत्त सदस्य कितीही वेळा फेरनिवडणुकीसाठी पात्र. / नामनिर्देशनासाठी पात्र.

Scanned by CamScanner

**पात्रता** → ① भारताचा नागरिक
② किमान वय विधानसभा - २५ व विधानपरिषद = ३०

**लोकप्रतिनिधी कायदा १९५१ चे निकष.**

① विधानसभेवर किंवा विधान परिषदेवर सदस्य होण्यासाठी संबंधित राज्यातील विधानसभा मतदारसंघात मतदार असला पाहिजे.

② नामनिर्देशीत करण्यासाठी संबंधित राज्यात निवासी असावी.

③ आरक्षित जागांसाठी संबंधित जातीचा असावा. परंतु आरक्षित नसलेली जागाही तो लढवू शकतो.

**अपात्रता** -
① लाभाच्या पदावर नसावा
② असंतुलीत मनाची असेल व न्यायालयाने तसे घोषित केले असेल.
③ भारताचा नागरिक नसेल.

**अतिरिक्त अनर्हता**
① निवडणूक अपराधांत दोषी नसावी.
② २ किंवा अधिक वर्षांची कैदेची शिक्षा झाली नसावी.
(मात्र प्रतिबंधात्मक स्थानबद्धता कायद्यांतर्गत स्थानबद्ध केल्यामुळे अनर्ह नाही)
③ निवडणूक खर्चाचे चुकीचे पत्रक सादर केले तर
④ सरकारी काम, कंत्राट किंवा सेवा यांत हितसंबंध गुंतलेले नसावे.
⑤ सरकारी भाग २५% (किमान) असलेल्या निगमामध्ये संचालक नसावा.
⑥ भ्रष्टाचार किंवा राज्याशी द्रोह या कारणासाठी सरकारी सेवेतून पदच्युत झालेला नसावा.
⑦ लाचलुचपतीचा गुन्हा सिद्ध झालेला नसावा.
⑧ अस्पृश्यता, हुंडा, सती अशा गुन्ह्यांचे समर्थन करण्याच्या गुन्ह्यासाठी त्याला शिक्षा झालेली नसावी.

**पक्षांतरामुळे अपात्रता**
→ घटनेच्या परिशिष्ट १० मधील तरतुदीनुसार पक्षांतराच्या कारणासाठी,
→ अपात्रतेबाबत सभापती व अध्यक्ष निर्णय घेतात राज्यपाल नाही.
(त्या निर्णयाचे न्यायिक पुनर्विलोकन होते. - १९९२ - सर्वोच्च न्याया.)

**शपथ किंवा प्रतिज्ञा** → पदग्रहण करण्यापूर्वी : राज्यपालासमोर किंवा त्याउद्देशाने त्याने नियुक्त केलेल्या व्यक्तीसमोर.
→ शपथ घेत नाही तोपर्यंत कामकाजात सहभागी होऊ शकत नाही / मतदान करू शकत नाही.
→ त्याला राज्य विधिमंडळाचे / विधीमंडळाचे विशेषाधिकार किंवा

Scanned by CamScanner

संरक्षण मिळत नाही.

* खालील परिस्थितीत तो गृहाच्या बैठकीस उपस्थित राहिला व त्याने मतदान केले तर 500 रु दंड होवू शकतो. — प्रत्येक दिवशी
① खालेली शपथ घेण्यापूर्वी तो बैठकीस हजर राहील.
② सदस्यत्वासाठी पात्र नाही हे माहित असूनही उपस्थित राहील.
③ कामकाजात सहभागी होण्यास किंवा मतदान करण्यास बंदी असताना.

वेतन व भत्ते - राज्यविधिमंडळ ठरवीते.

## पद रिक्त होणे

① दुहेरी सदस्यत्व ⇒ एकाच गृहाची सदस्य असू शकतो.
② अपात्रता ⇒ अपात्र ठरला तर.
③ राजीनामा ⇒ अध्यक्षाकडे किंवा सभापती कडे. (लिखित)
राजीनामा स्वीकारल्यावरच पद रिक्त होते.
④ अनुपस्थिती ⇒ परवानगी न घेता जर सदस्य 60 दिवस बैठकांना अनुपस्थित राहील.
⑤ इतर ⇒ जर न्यायालयाने त्याची निवडणूक अवैध ठरवली.
जर गृहाने त्याला काढून टाकले.
जर तो राष्ट्रपती किंवा उपराष्ट्रपती म्हणून निवडून आला.
जर त्याची राज्यपाल पदी नियुक्ती झाली.

## विधानसभा सभापती

⇒ सदस्यांपैकी एकाची निवड
⇒ मुदत विधानसभेच्या मुदती इतकी. परंतु खालील तीन परिस्थितीत तो कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वीच पद सोडतो. जर
* विधानसभेचा सदस्य राहिला नाही.
* उपसभापतीकडे उद्देशून राजीनामा सादर केला.
* तत्कालीन सदस्यांनी बहुमताने ठराव संमत करून पदावरून हटविले.
(14 दिवसांची पूर्वसूचना देवून)

## अधिकार व कार्य

① कामकाजाचे नियमन.
② घटनेचा अन्वयार्थ
③ गणपूर्ती अभावी सभा स्थगित करणे.
④ निर्णायक मत.
⑤ गुप्त बैठकीस परवानगी
⑥ अर्थ विधेयक ठरविणे.
⑦ परिशिष्ट 10 - सदस्य अपात्रता.
⑧ सर्व समित्यांच्या अध्यक्षांची नियुक्ती व कामकाज सल्लागार, नियम, सर्वसाधारण उद्देश समितीचा अध्यक्ष.

Scanned by CamScanner

## विधानसभा उपसभापती ⇒

⇒ सदस्यामधून निवड.

⇒ विधानसभा कार्यकालापर्यंत पदावर

⇒ पद रिक्त होणे - 3 कारणे

① सदस्य राहिला नाही.

② राजीनामा दिला - सभापती कडे

③ बहुमताने ठराव संमत करून पदावरून हटविले (१४ दिवसांची पूर्वसूचना देऊन)

कार्ये : सभापती पद रिक्त असताना सभापतीची कार्ये पार पाडतो. } दोन्ही परिस्थितीत पूर्ण अधिकार प्राप्त होतात.
सभापती अनुपस्थित असताना — " —

## विधानपरिषदेचा अध्यक्ष

→ सदस्यामधून निवड.

→ पद रिक्त होणे ⇒ ① सदस्य राहिला नाही तर

② राजीनामा दिला - उपाध्यक्षाकडे

③ बहुमताने ठराव संमत - पदावरून हटविले (१४ दिवसांची पूर्वसूचना)

कार्ये ⇒ विधानसभेच्या सभापती प्रमाणे.

फरक ⇒ एखादे विधेयक अर्थ विधेयक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार नाही.

⇒ अध्यक्षाचे वेतन व भत्ते राज्य विधिमंडळ ठरवते. - राज्याच्या संचित निधीवर भारित.

## विधानपरिषदेचा उपाध्यक्ष

⇒ सदस्यामधून निवड

- पद रिक्त होणे → ① सदस्य राहिला नाही तर

② राजीनामा — अध्यक्षाकडे

③ बहुमताने ठराव संमत — पदावरून हटविले (१४ दिवस पूर्वसूचना)

कार्ये ⇒ अध्यक्षपद रिक्त असेल तेव्हा त्याची सर्व कामे. } सर्व अधिकार प्राप्त.
अध्यक्ष अनुपस्थित — " —

## राज्यविधिमंडळाची अधिवेशने

① अधिवेशन बोलाविणे ⇒ राज्यपाल दोन्ही गृहांची अधिवेशने बोलावतो.

⇒ दोन अधिवेशनांतील अंतर कमाल ६ महिने

⇒ वर्षातून किमान 2 वेळा.

② संस्थगिती ⇒ कामकाज काही ठराविक काळासाठी स्थगित ठेवणे (तास/दिवस/आठवडे)

⇒ अनिश्चित काळासाठी स्थगित ठेवणे

(दोन्ही अधिकार अध्यक्ष / सभापतीला)

Scanned by CamScanner

③ बरखास्त - अधिवेशनाचे कामकाज संपल्यानंतर गृह अनिश्चित कालासाठी स्थगित होते. त्यानंतर काही दिवसात राज्यपाल अधिवेशन बरखास्त केल्याची सूचना जारी करतो.

⇒ अधिवेशन चालू असताना देखील राज्यपाल अधिवेशन बरखास्त करू शकतो.

④ विसर्जन ⇒ फक्त विधानसभा विसर्जित होते.

अशा परिस्थितीत विधेयके लोप पावण्याची स्थिती.

① विधानसभेत प्रलंबित असलेले विधेयक लोप पावते (विधानसभेतील किंवा विधानपरिषदेकडून आलेले)

② विधानसभेने संमत केलेले परंतु विधान परिषदेकडे प्रलंबित असलेले लोप पावते.

③ विधान परिषदेत प्रलंबित असलेले पण विधान सभेने संमत न केलेले विधेयक लोप पावणार नाही.

④ दोन्ही गृहाकडून संमत झालेले व राज्यपाल किंवा राष्ट्रपतीच्या मान्यतेसाठी प्रलंबित असलेले विधेयक लोप पावत नाही.

⑤ राष्ट्रपतीने पुनर्विचारार्थ पाठवलेले विधेयक लोप पावत नाही.

गणपूर्ती /गणसंख्या -

⇒ गृहाच्या बैठकीत कामकाज करण्यासाठी गृहात उपस्थित असणाऱ्या सदस्यांची किमान आवश्यक संख्या ⟶ गृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या 1/10 इतकी.

⇒ गणपूर्ती अभावी अध्यक्ष/सभापती गृह स्थगित करतो.

सभागृहातील मतदान : काही बाबी साध्या बहुमताने (उपस्थितांच्या निम्म्यापेक्षा जास्त)

or काही बाबी पूर्ण बहुमताने (एकूण सदस्य संख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त)

अध्यक्ष/सभापती पहिल्या टप्प्यात मतदान करीत नाहीत पण समान मते पडल्यास निर्णायक मत देतात.

कामकाजाची भाषा

⇒ राज्याची अधिकृत भाषा किंवा हिंदी किंवा इंग्रजी.

सदस्याला मातृभाषेत बोलण्याची परवानगी मिळू शकते.

⇒ घटना लागू झाल्यानंतर पंधरा वर्षांनी इंग्रजी भाषेचा वापर चालू ठेवण्याचा निर्णय घेण्याचा विधिमंडळाला अधिकार देण्यात आला होता.

हिमाचल प्र, मणिपूर, मेघालय, त्रिपुरा ⟶ या राज्यांसाठी मर्यादा 25 वर्षे } होती
अरुणाचल प्र, गोवा, मिझोराम ⟶ — ” — 40 वर्षे

मंत्री आणि महाधिवक्ता अधिकार - प्रत्येक मंत्री व राज्याचा महाधिवक्ता कोणत्याही गृहाच्या व तो सदस्य असलेल्या समितीच्या कामकाजात सहभागी होऊ शकतो म्हणणे मांडू शकतो. मतदान फक्त सदस्य असलेल्या गृहात - महाधिवक्ता मतदान करू शकत नाही

Scanned by CamScanner

## राज्य विधिमंडळाची कायदेविषयक प्रक्रिया :

सामान्य विधेयक ⇒ कोणत्याही गृहात

⇒ मंत्री किंवा सदस्य मांडू शकतो.

⇒ त्यानंतर प्रथम वाचन, द्वितीय वाचन, तृतीय वाचन

⇒ द्विगृही असेल तर दुसऱ्या गृहाकडे अन्यथा राज्यपालांकडे.

दुसऱ्या गृहात प्रथम वाचन, द्वितीय वाचन, तृतीय वाचन

विधानसभेने विधेयक संमत करून विधानपरिषदेकडे पाठविल्यानंतर त्या गृहाकडे चार पर्याय

① पाठवलेले विधेयक आहे त्या स्वरूपात संमत करणे.

② दुरुस्ती करून संमत करणे व पुनर्विचारासाठी विधानसभेकडे परत पाठविणे.

③ विधेयक पुर्णतः असंमत करणे

④ प्रलंबित ठेवणे

① विधानपरिषदेने काहीही दुरुस्ती न करता विधेयक संमत केले किंवा विधानपरिषदेने सुचविलेल्या दुरुस्त्या विधान सभेने स्वीकारल्या तर विधेयक दोन्ही गृहांनी संमत केले असे समजून राज्यपालांकडे पाठवले जाते.

② मात्र विधानपरिषदेने विधेयक पुर्णतः असंमत केले किंवा तीन महिने काहीही कृती केली नाही किंवा विधान परिषदेने सुचवलेल्या दुरुस्त्या विधान सभेने स्वीकारल्या नाहीत तर विधानसभा ते विधेयक परत संमत करून विधानपरिषदेकडे पाठवू शकते.

③ पुन्हा विधान परिषदेने विधेयक पुर्णतः असंमत केले किंवा विधानसभेने न स्वीकारलेल्या दुरुस्त्या करून ते संमत केले किंवा एक महिना काहीही कृती केली नाही तर ज्या स्वरूपात विधानसभेने दुसऱ्या वेळी ते संमत केले त्या स्वरूपात दोन्ही गृहांनी संमत केले असे मानले जाते.

* त्यामुळे सामान्य विधेयक संमत करण्याचा अंतिम अधिकार विधानसभेला

* विधानपरिषद 3+1 = 4 महिने विलंब करू शकते.

* संयुक्त बैठकीची तरतूद नाही.

④ जेव्हा विधेयक विधानपरिषदेत विधानसभेत येते आणि जर ते विधानसभेने असंमत केले तर लोप पावते.

✻ राज्यपालांची मान्यता ✻

① मान्यता देऊ शकतो

② राखून ठेवू शकतो

③ पुनर्विचारार्थ पाठवू शकतो (दुरुस्ती करून / दुरुस्ती शिवाय परत आलेले विधेयकाला मान्यता - बंधनकारक)

④ राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवू शकतो.

Scanned by CamScanner

## राष्ट्रपतीची मान्यता

जेव्हा राज्यपाल विधेयक राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवतो त्यावेळी

राष्ट्रपती ① मान्यता देतो
② राखून ठेवतो
③ राज्यविधिमंडळाकडे पुनर्विचारार्थ पाठवतो (परत आलेले विधेयक मान्य करणे बंधनकारक नाही)

## अर्थ विधेयक

① फक्त विधानसभेतच सादर करता येते.
② राज्यपालांची पूर्वशिफारस आवश्यक
③ सरकारी विधेयक → फक्त मंत्रीच सादर करू शकतात.

* विधानसभेने संमत केल्यावर विधानपरिषदेकडे -

⇒ विधानपरिषद दुरुस्ती करू शकत नाही.
⇒ असंमत करू शकत नाही. फक्त शिफारशी करू शकते.
⇒ १४ दिवसांच्या आत परत विधानसभेकडे पाठविणे गरजेचे.
⇒ केलेल्या सूचना स्वीकारणे विधानसभेला बंधनकारक नाही.

राज्यपाल - ① मान्यता देऊ शकतो.
② राखून ठेवू शकतो.
③ राष्ट्रपतीच्या मान्यतेसाठी राखून ठेवू शकतो.
④ पुनर्विचारार्थ पाठवू शकत नाही.

राष्ट्रपती - ① मान्यता देऊ शकतो
② राखून ठेवू शकतो
③ पुनर्विचारार्थ राज्य विधिमंडळाकडे पाठवू शकत नाही.

## विधानसभा व विधानपरिषद - समान बाबी

① सामान्य विधेयक सादर करणे.
② अध्यादेशांना मान्यता
③ मुख्यमंत्री किंवा मंत्री नियुक्त
④ राज्य लोकसेवा आयोगाच्या अधिकार क्षेत्रात वाढ करणे

## भिन्न बाबी

① अर्थ विधेयक फक्त विधानसभेत
② अर्थ विधेयक संमत करण्याची प्रक्रिया
③ अर्थ विधेयक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार विधानसभा सभापतीला.
④ विधानपरिषद - अर्थसंकल्पावर फक्त चर्चा. अनुदानाच्या मागण्यांवर मतदान करू शकत नाही.

Scanned by CamScanner